# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

**(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)**

**मुख्य कार्यालय :** चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ,
अशोक नगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-६९०६७९००, ६९०६७९१८
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in


## निविदा क्र - प्रशासन/वाहन पुरवठा /०६/२०२५

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे येथे कार्यालयीन वापरासाठी विविध प्रकारची १७ वाहने भाडेतत्वावर पुरवठा करण्याकरीता दोन लिफाफा पध्दतीने पात्र व इच्छुक निविदा धारकांकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे वर्णन | कालावधी | बयाणा रक्कम | कामाची अंदाजित एकूण रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|
| १. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयास विविध वाहने भाडेतत्वावर पुरविणेबाबत. (वाहनांची अंदाजित संख्या)<br>१. इनोव्हा एसी-१<br>२. अमेझ, डिझायर, एक्सेन्ट इ. संवर्ग एसी -१४<br>३. एर्टिगा/बोलेरो-२ | ३ वर्षे | रु.२,४५,०००/- (१%) | रु.२,४५,००,०००/- | रु.५०००/- |

वरील सेवा पुरविण्याकरीता मान्यता प्राप्त व इच्छुक कंत्राटदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. नियम व अटीच्या पूर्ततेसह निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन दि.१७/१०/२०२५ ते दि.३१/१०/२०२५ वेळ ३:०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी Download करावयाचे आहेत. निविदा फॉर्म फी रक्कम रु.५,०००/- व बयाणा रक्कम रु.२,४५,०००/- Online by Net Banking System पध्दतीने भरावयाचे आहे. सदर निविदा प्रक्रियेचा कालावधी व तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Details | Start Date | Hrs. | End Date | Hrs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Publication of Tender | 17/10/2025 | 13.00 hrs | | |
| 2 | Tender Document Download and Bid Submission Online | 17/10/2025 | 13.00 hrs | 31/10/2025 | 15.00 hrs |
| 3 | Last Date for Online bid Submission | 31/10/2025 | 15.00 hrs | | |
| 4 | Date of Opening of Technical bid documents | 03/11/2025 | 15.00 hrs | | |

१.१ निविदा फॉर्म फी व बयाणा रक्कम भरणेसाठी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन Online by Net Banking System वापरण्यात यावी.

## १.२ <u>निविदा सादर करणेबाबत :-</u>

निविदा या मुदतीत दोन लिफाफे पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. लिफाफा क्र.१ तांत्रिक (Technical) हा अपुर्ण सादर केलेस अथवा तांत्रिक अर्हतेबाबत आवश्यक कागदपत्रांची पुर्तता झाली नसल्यास अशी तांत्रिक निविदा नामंजूर करणेत येईल. निविदाधारकानी निविदे सोबत आवश्यक असलेले सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.

सदर निविदा प्रक्रियेमध्ये झो.पु.प्रा. कार्यालयातील कार्यरत सर्व (प्रतिनियुक्ती, कंत्राटी व सेवानिवृत्त) अधिकारी/कर्मचारी तसेच त्यांचेशी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध असलेल्यांना निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

कर्तव्यामध्ये कसूर केल्यामुळे यापूर्वी राज्य शासकीय विभाग/उपक्रम/संस्था यांनी पुरवठा आदेश रद्द केलेल्या कोणत्याही कंपनी/संस्थेला सदर निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. अशा प्रकारे काम रद्द केलेल्या कंपनी/संस्था यांच्याशी संबंधित व्यक्तींनी अन्य कंपनी/संस्था यामध्ये सहभाग घेतला असल्यास अशी कंपनी/संस्था निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेऊ शकणार नाही.

## २.० <u>लिफाफा क्र.१ तांत्रिक :- सादर करावयाची कागदपत्रे</u>

१) बयाणा रक्कम रु.२,४५,०००/- व निविदा फॉर्म फी रु.५,०००/- कार्यालयाच्या खात्यावर जमा केलेबाबत स्कॅन पावती.

२) निविदा अर्ज प्रपत्र-१ नुसार (स्वत:च्या लेटर पॅडवर)

३) मोटार ट्रान्सपोर्ट वर्क्स ॲक्ट १९६१ नुसार पुरविण्यात येणा-या सर्व वाहनांचा रजिस्ट्रेशन दाखला.

४) निविदाधारक संस्थेची शॉप ॲक्ट/कंपनी आधिनियम/भारतीय भागीदारी अधिनियम अंतर्गत नोंदणी झालेली असावी आणि संस्थेच्या गठनामध्ये वाहन पुरवठा असा उद्देश नमूद असावा आणि कंत्राटाची सुसंगत नोंदणी झालेली असावी. त्या अनुषगाने कंपनी/संस्था यांचे सक्षम प्राधिका-याकडील नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे .

५) निविदाधारकास कमीत कमी ३ वर्षांचा शासकीय/निमशासकीय संस्थेत किमान ५ वाहने पुरविण्याचा अनुभव असावा व वाहन पुरवठा सेवा समाधानकारक पुरविलेबाबत तपशीलवार माहिती (प्रपत्र -२) तसेच त्याबाबतचे त्या त्या संस्थेचे प्रमाणपत्र.

६) जेथे निविदाकार हे सहकारी संस्था/प्रा.लि. कंपनी/भागीदारी संस्था/अन्य संस्था असतील, अशा प्रकरणी संस्थेच्या ठरावाची प्रत.

७) मागील ३ वर्षात निविदाकारासंदर्भातील (सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४) कमीत कमी रु.१ कोटी प्रति वर्ष इतकी आर्थिक उलाढाल असावी व त्यासंदर्भात सनदी लेखापालाकडून प्रमाणित केलेले प्रमाणपत्र (प्रपत्र-३)

८) निविदाकाराचे मागील तीन वर्षाचे नक्त मूल्य (Net Worth) अधिक (+) असावे. त्याबाबत सनदी लेखापाल यांचे कडील प्रमाणपत्र सादर करावे.

९) मागील तीन वर्षांचे सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ आयकर नोंदणी (पॅन) व आयकर विवरण पत्र दाखल केलेबाबत ITR-V.

१०) निविदाधारकाचे GST नोंदणी व सन २०२३-२४ पर्यंतच्या कालावधीचे GST भरल्याबाबतचे प्रमाणपत्र.

११) पुरविण्यात येणा-या एकूण वाहनांपैकी किमान ३ वाहने दि.०१ जानेवारी २०२३ नंतर खरेदी केलेली असावी आणि पुरवण्यात येणा-या सर्व वाहनांसाठी निविदाधारकाच्या/भाडेकरार धारकाच्या स्वत:च्या मालकीची वैध परवाना असलेली पिवळ्या नंबर प्लेटची वाहनांची यादी सादर करावी. उर्वरीत वाहनांबाबत दि.०१ जानेवारी २०२० नंतर खरेदी केलेल्या वाहनांबाबत संबंधित गाडी मालकांकडून ३ वर्षांसाठीचा Notarized करारनामा केलेला असावा आणि त्याची प्रत सादर करावी. तसेच पुरविण्यात येणारे वैध परवाना असलेली पिवळ्या नंबर प्लेटचे प्रत्येक वाहनासाठी वैध पीयुसी, वैध विमा व रस्ता कर याबाबतची कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. (प्रपत्र-६)

१२) शासनाच्या कोणत्याही विभागाने अथवा उपक्रमाने काळया यादीत टाकले नसल्याचे तसेच यापूर्वी पुरवठा आदेश रद्द केले नसल्याचे स्वयंघोषणापत्र व गुन्हा नोंद नसलेबाबतचे स्वयंघोषणापत्र (प्रपत्र ४, रु.५००/- च्या स्टॅम्प पेपर वर)

**२.१ लिफाफा क्र.२ वित्तीय निविदा :-**

निविदाधारकाने वित्तीय लिफाफ्यामधील माहिती प्रपत्र-५ पध्दतीने सादर करावी. आवश्यक असलेल्या सर्व १७ वाहनांसाठी निविदा सादर करणे आवश्यक असेल.
न्यूनतम निविदा दर निश्चितीसाठी प्रस्तावित वाहन संख्या व सादर दर यानुसार एकत्रित निविदा खर्च परिगणना करण्यात येईल.

**२.२ लिफाफा क्र.१ तांत्रिक लिफाफा उघडण्याबाबत:-**

लिफाफा क्र.१ मधील सर्व कागदपत्रांची झोपुप्रा मार्फत नियुक्त केलेल्या समितीमार्फत तपासणी केली जाईल तसेच समितीने घेतलेले निर्णय अथवा अटी व शर्ती त्या निविदाधारकांना बंधनकारक राहतील, तसेच याबाबतचे पूर्ण अधिकार समितीला असतील व याबाबत निविदाधारकांना तक्रार करता येणार नाही.

सदरची निविदा प्रक्रिया ही दोन लिफाफा पध्दतीने आहे. लिफाफा क्र.१ मधील तांत्रिक लिफाफ्याची छाननी झाल्यानंतर लिफाफा क्र.१ बाबत कमीत कमी तीन निविदाधारकांचे लिफाफे पात्र ठरले तरच सदर दिवशी लिफाफा क्र.२ वित्तीय लिफाफा उघडला जाईल. परिच्छेद क्र.२.० नुसार तांत्रिक लिफाफ्यामधील मागणी केलेली सर्व कागदपत्रे आवश्यक आहेत. कमी कागदपत्रांचा लिफाफा अथवा चुकीची कागदपत्रे सादर केलेला लिफाफा नामंजूर करण्यात येईल व त्याबाबत ठेकेदारांना तक्रार करता येणार नाही.

**२.३ निविदांचे मूल्यमापन:-**

१) प्राधिकरण स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत तांत्रिक लिफाफयामधील आवश्यक कागदपत्रांची तपासणी केली जाईल.

२) निविदाधारक पात्रतेचे सर्व निकष निविदाधारकाची ऐपत, निविदा कालावधी पुर्ण करण्याबाबतची क्षमता याबाबतची छाननी निविदाधारकाने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे समिती ठरवेल.

३) निविदाधारकांकडून निविदा सादर करताना गैरप्रकार केला गेल्यास अथवा सादर केलेल्या निविदा, निविदाधारकांनी परस्परांच्या संगनमताने सादर केलेल्या आहेत का? याची शहनिशा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण नियुक्त समितीमार्फत केली जाईल.

४) निविदाधारकांची निविदा परिपुर्ण असणे आवश्यक आहे. अपूर्ण कागदपत्रांच्या निविदा नामंजूर करण्यात येतील व सदरच्या निविदांचा वित्तीय लिफाफा उघडण्यात येणार नाही, तसेच निविदाधारक आपल्या निविदेची स्थिती संकेतस्थळावर पाहू शकतात.

५) ज्या निविदाधारकांचा तांत्रिक लिफाफा परिपूर्ण असेल तेच निविदाधारक लिफाफा क्र.२ (वित्तीय लिफाफा) उघडण्यास पात्र ठरतील. पात्र ठरलेल्या निविदाधारकांना लिफाफा क्र.२ उघडण्याबाबत वेळ व दिनांक कळविला जाईल अथवा सदर निविदेस स्पर्धा होत असल्यास निविदेमधील अटी व शर्ती शिथिल करण्याचा अधिकार समितीस राहील. याबाबत निविदाधारकास तक्रार करता येणार नाही.

६) निविदाधारकांनी सादर केलेल्या दरांची तपासणी ही मूल्यमापनाचे आवश्यक ते निकष लावून केली जाईल व ते सर्व निकष निविदाधारकांवर बंधनकारक राहतील.

## २.४ <u>निविदा अटी व शर्ती</u>

१) वाहन भाडेतत्वावर घेण्याचा कालावधी कार्यादेश दिल्यापासून ३ वर्षांपर्यंत राहील. पुरवठा सेवा समाधानकारक नसल्यास संबंधितास सुनावणीची संधी देऊन मुदतपूर्व करार रद्द करण्यात येईल.

२) वाहनाची संख्या व प्रकार आवश्यकतेप्रमाणे कमी अथवा जास्त होऊ शकते.

३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड, पुणे कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील निविदाधारक/पुरवठादार/नोंदणीकृत संस्थेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

४) सर्व वाहने स्वच्छ, पांढरा रंग व उत्कृष्ठ देखभाल केलेले सुस्थितीत असावीत व जास्तीतजास्त ५ वर्ष जुनी असावीत व त्यासंदर्भात RTO कडील टुरिस्ट परवाना आवश्यक आहे. एकूण वाहनांपैकी किमान ३ वाहने २०२३ नंतर खरेदी केलेली आणि निविदाधारकाच्या स्वत:च्या मालकीची वैध परवाना असलेली पिवळ्या नंबर प्लेटची असावीत. निविदेसोबत वाहनांची यादी RC बुक सहित जोडावी. उर्वरीत वाहनांबाबत-२०२० नंतर खरेदी केलेल्या वाहनांकरीता संबंधित गाडी मालकांकडून ३ वर्षांसाठीचा भाडे करारनामा केलेला असणे व तो निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. अशी वाहने सुध्दा पिवळ्या नंबर प्लेटची असावीत व त्यांचे संदर्भातील RC बुक सादर करणे आवश्यक राहील.

५) इंधन, ऑइल,दुरुस्ती (सर्व्हिसींग), विमा पॉलिसी व सर्व शासकीय कर, नियमानुसार वाहन चालकाचा पगार व वाहनाचा घसारा, टोल चार्जेस व पार्किंग इ.सर्व बाबीचा खर्च स्वतंत्रपणे दिला जाणार नाही, हे विचारात घेऊन पुरवठादाराने दर नमूद करावेत. तसेच देयकातील नमूद दर हे सेवाकर/जी एस टी करा व्यतिरिक्त इतर सर्व करासहित असतील. वाहन चालकाकडे वाहन चालविण्याचा कायमस्वरुपी परवाना असणे आवश्यक आहे.

६) वाहन वापराचा कालावधी अधिका-यांच्या सोयीनुसार दरदिवशी १२ तासांचा राहील. एखाद्या दिवशी या कालावधीपेक्षा अधिक काळ जर वाहनाची आवश्यकता असेल तर त्याची पूर्वसुचना दिली जाईल व त्या सुचनेप्रमाणे वाहन उपलब्ध होणे आवश्यक आहे. महिन्यातील शासकीय सुट्टया सोडून कामाचे दिवशी

वाहन पुरविण्यात यावे. सुटीच्या दिवशी वाहनाची आवश्यकता वाटल्यास तसे अगोदर कळविण्यात येईल व त्यानंतरच सुट्टीचे दिवशी वाहन पुरविण्यात यावे.

७) पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्राव्यतिरिक्त इतर ठिकाणी (उदा. मुंबई) दौरा कार्यक्रम अधिकाऱ्यांचा असेल तर वाहन पुरवठा करण्यात यावा व त्याबाबतचे दर प्रपत्र-५ मध्ये सादर करावे. दौरा कार्यक्रम दिवशी नेहमीचे वाहनाचे देयक अधिकाऱ्यांकडून साक्षांकित करून घेऊ नये जेणे करून एकाच दिवशीचे दुबार देयक होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८) वाहनाचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ठेकेदाराची/वाहन मालकाची राहील. त्याबाबत नुकसान भरपाई प्राधिकरणामार्फत मिळणार नाही. प्रत्येक वाहनासंदर्भात त्रयस्थ पक्ष विमा आणि वापरकर्त्याच्या सुरक्षेसाठी आवश्यक विमा कंत्राटदाराने काढावा व तो सदैव नूतनीकरण केलेला असावा.

९) वाहनाचा सर्व समावेशक विमा (Full Insurance/Comprehensive Insurance) काढलेला असणे आवश्यक असून त्यामध्ये त्रयस्त व्यक्तीचाही समावेश असावा. प्रत्येक वाहनाची विमा पॉलिसी सदैव कार्यरत असणे आवश्यक आहे व त्यासाठीचा प्रीमियम आदी खर्च निविदाकाराने करावा.

१०) डिझेल, पेट्रोल, ऑईल इ.दरात वाढ झाल्यास चालू दरामध्ये वाढ करण्यात येणार नाही.

११) जी वाहने प्राधिकरणाकडे पुरवठा करण्यात येणार आहेत त्या वाहनांची कागदपत्रे, (आर सी व टी सी पुस्तक) हवा प्रदुषण प्रमाणपत्र, विमा पॉलिसी, वाहनचालकाचे लायसेन्स, इं.ची साक्षांकित झेरॉक्स प्रत, सक्षम अधिकारी यांनी दिलेला प्रवासी वाहतूक परवाना (टुरिस्ट परमिट) आणि शॉपॲक्ट लायसेन्सची झेरॉक्स प्रत प्राधिकरणाकडे देणे आवश्यक आहे.

१२) कार्यादेश मिळाल्यानंतर प्राधिकरणाकडे वाहने भाडयाने देण्यासाठी तसेच भाडयाने लावलेल्या वाहनांमध्ये बदल करण्यासाठी किंवा नवीन वाहन पुरविण्यासाठी प्रशासन विभागास लेखी कळविणे आवश्यक आहे. त्यासाठी प्राधिकरण सचिव यांची परवानगी घेणे आवश्यक राहील. प्राधिकरण सचिव, झो.पु.प्रा.,पुणे यांच्या परवानगी शिवाय परस्पर वाहन पुरविल्यास त्याचे देयक अदा करण्यात येणार नाही.

१३) वाहनांचे भाडे महिना पूर्ण झाल्यानंतर दिले जाईल, त्यासाठी वाहनाचे रोजचे दैनंदिन वही (Logbook) अद्ययावत भरुन संबंधीत अधिकारी यांचेकडून साक्षांकित करुन घ्यावे. दैनंदिन वही देयकासोबत सादर करावे अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

१४) वाहनाचे किलोमीटर मोजणी प्राधिकरण कार्यालयापासून धरण्यात येईल व दिवसाच्या शेवटची मोजणी प्राधिकरण कार्यालयात घेण्यात येईल. मुख्यालय सोडून जर मुक्काम करण्यात आला तर नेहमीच्या दरानेच चार्जेस दिले जातील.

१५) प्राधिकरणाचे कार्यक्षेत्र हे पुणे व पिंपरी चिंचवड शहर असे राहील/समजण्यात येईल, तसेच या कार्यक्षेत्राबाहेर वाहन गेल्यास व मुक्काम झाल्यास निविदेतील मंजूर दरानेच वेगळा दर दिला जाईल.

१६) सुरक्षा अनामत रक्कम रु.७,३५,०००/- (निविदा भरणा करतेवेळी बयाणा रक्कम रु.२,४५,०००/- व उर्वरीत रु.४,९०,०००/-) जमा करुन त्या चलनाची प्रत लेखा विभागामध्ये कार्यादेश मिळताच १५ दिवसांच्या आत जमा करणे बंधनकारक असेल. सदर रकमेचा भरणा वेळेत न केल्यास L-१ निविदाकाराचे कंत्राट रद्द करून प्रकरणी L-१ च्या जोखीम व दायित्वावर L२ निविदाधारकास कार्यादेश देण्यात येईल.

१७) वाहनांचे देखभाल, दुरुस्ती अपघात किंवा इतर काही नुकसान झाल्यास त्याची सर्व जबाबदारी वाहन मालकाची राहील. कार्यालयाच्या मागणीनुसार निविदेत नमूद केलेल्या १७ पेक्षा कमी किंवा जास्त वाहने

पुरवावी लागतील. मागणी करुनही निविदाकार वाहन पुरविण्यास असमर्थ ठरल्यास व वाहन दुसरीकडून भाडयाने घ्यावे लागल्यास, त्याबाबतचा सर्व खर्च निविदाकाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

१८) करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची राहील आणि आवश्यकतेप्रमाणे मंजूर निविदाधारकाचे नाव काळया यादीत घालून अनामत रक्कम जप्त करणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल. ज्या निविदाधारकांची सेवा समाधानकारक नसल्यामुळे यापूर्वी अन्य कोणत्याही शासकीय विभागांनी कंत्राट रद्द केले असेल, अशा निविदाधाराकांनी सदर निविदा प्रक्रीयेमध्ये सहभाग घेऊ नये. अशी बाब निर्दशनास आल्यास निविदा कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल व कंत्राट दिले असल्यास रद्द करण्यात येईल.

१९) वाहन नादुरुस्त झाल्यास ते निविदाकाराने स्वखर्चाने त्वरीत दुरुस्त करुन घेण्यात यावे. तसेच कार्यालयाची गैरसोय होऊ नये म्हणून त्या कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी वाहन उपलब्ध करुन देण्यात यावे. उपलब्ध केलेले पर्यायी वाहन योग्य नसल्यास ते नाकारणेचा अधिकार प्रधिकरणाचा राहील.

२०) प्राधिकरणाकडे जमा सुरक्षा ठेव ही एकत्रितपणे ठेव गृहीत धरण्यात येईल व या रकमेमधूनच कोणत्याही वाहनामुळे झालेल्या नुकसान भरपाईची रक्कम वसूल करता येईल व ही सुरक्षा ठेव रक्कम करार संपुष्ठात आल्यावर परत करण्यात येईल. त्यावर व्याज देता येणार नाही.

२१) निविदाधारकांकडून वाहतूक परवाना (टुरिस्ट परमिट) व पिवळया रंगाची नंबर प्लेट असलेली वाहने कार्यालयास पाठविण्यात यावीत. नॉन परमिटचे वाहन उपलब्ध केल्यास त्याचा वापर करण्याबाबत उचित निर्णय घेण्यात येईल. वाहनचालक उपलब्ध नसल्यास तसेच पेट्रोल/डिझेल उपलब्ध नसल्यास व त्यामुळे वाहन बंद असल्यास किंवा इतर कोणत्याही कारणाने वाहन उपलब्ध नसल्यास अशा प्रकरणी देय रकमेच्या दुप्पट इतका दंड आकारणेत येईल.

२२) कराराप्रमाणे वाहने न पुरविल्यास अन्य समर्पक शास्ती व्यतिरिक्त निविदा व करार रद्द करण्यात येईल व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२३) करार झाल्यानंतर योग्य पध्दतीने वाहन पुरविण्याची जबाबदारी निविदाधारकाची आहे. वारंवार वाहन नादुरुस्त होत असेल तर कार्यालयाच्या खोळंबा होऊ शकतो. प्रत्येक तिमाहीमध्ये तीन वेळेपेक्षा अधिक वेळा वाहन नादुरुस्त झाल्यास असे वाहन रद्द करण्यात येईल व सदर वाहनांऐवजी सुस्थितीतील पर्यायी वाहन पुरवणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

२४) वाहनचालकाकडे वैध वाहन चालवण्याचा परवाना असला पाहिजे व चालकाची वर्तणूक ही चांगली असली पाहिजे व चालक कर्तव्य कालावधीमध्ये निर्व्यसनी असला पाहिजे. कोणत्याही वाहनचालकाविरुध्द प्राधिकरणातील कर्मचारी/अधिकारी यांची सबळ कारण दर्शवून तक्रार आल्यास दोन दिवसात त्या वाहनचालका ऐवजी नवीन वाहनचालक पुरविण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

२५) निविदाधारकाने सादर केलेल्या सर्व कागदपत्रकांपैकी प्रत्येक प्रपत्रावर त्याची सही व शिक्का असणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही.

२६) एकदा सादर केलेली निविदा रद्द केली जाणार नाही आणि तसे झाल्यास संबंधिताचे नाव काळ्या यादीत जाईल.

२७) निविदा नामंजूर झाल्याचे अयशस्वी निविदाकारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही. सर्व निविदाकारांनी या संदर्भातील सूचना, निर्णय वेबसाईटवर पहावेत.

२८) निविदा पत्रात कोणत्याही प्रकारची खाडाखोड चालणार नाही.

२९) निविदाकाराच्या कामाच्या गुणवत्ता पडताळणीचा अंतिम अधिकार सचिव, झोपुप्रा,पुणे यांचा राहील. काम असमाधानकारक दिसून आल्यास योग्य ती दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

३०) निविदा मंजूर झाल्यानंतर निविदाधारकाने आवश्यक तो करारनामा, नियमानुसार आवश्यक तेवढ्या मुद्रांक शुल्काच्या स्टॅम्प पेपरवर स्वखर्चाने ठरवून दिलेल्या नमुन्यामध्ये करावा.

३१) निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफे परिपूर्ण बाबी/कागदपत्रे यासह सादर असल्याशिवाय व पूर्ण कागदपत्रे दाखल/अपलोड केले असल्याशिवाय लिफाफा क्र.२ मधील वित्तीय निविदा उघडता येणार नाही.

३२) निविदा प्रक्रिया कुठल्याही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्वीकृत करणे, नाकारणे, रद्द करणे तसेच निविदा उघडण्याच्या तारखेत व वेळेत बदल करणे याबाबतचे अधिकार मुल्यमापन समितीच्या शिफारशीनुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी झोपुप्रा, पुणे यांना राखून ठेवलेले आहेत.

३३) कंत्राटदार व झोपुप्रा यामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद उदभविल्यास लवाद अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने सोडवला जाईल व या कामी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा.,यांचा एक व्यक्ती लवाद राहील व लवादाचा निर्णय हा उभय पक्षांवर बंधनकारक राहील.

३४) सदरचे कंत्राट अन्य कोणत्याही व्यक्ती/संस्थेस पोट भाड्याने देता येणार नाही. निविदाधारकाने स्वत:च्या अटी प्रस्तावित करू नये. अशा अटीयुक्त निविदांचा विचार केला जाणार नाही.

३५) मंजूर कंत्राटदाराचे कंत्राट कालावधीमधील कामकाज समाधानकारक आढळून आल्यास सदर कंत्राटदाराला पुढील कालावधीसाठी मंजूर दराने मुदतवाढ देणेबाबतचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहे. अशा वेळी कंत्राटदाराला निविदेतील मंजूर दराने त्या कालावधीसाठी काम करणे आवश्यक राहील. तसेच कंत्राटदाराच्या सेवा तत्पूर्वी समाप्त करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

३६) मंजूर कंत्राटदाराने पुरविण्यात येणा-या वाहनांचे दैनंदिन नोंदवही (Logbook) परिपूर्ण ठेवणे व त्यावर वापर अनुज्ञेय असलेल्या अधिका-याने स्वाक्षरी करून प्रवास प्राधिकृत करणे आवश्यक राहील, त्यानुसार वाहन पुरवठयाच्या देयकाची रक्कम अदा केली जाईल व प्रचलित नियमाप्रमाणे देयकामधून आयकर व इतर कपाती (लागू असल्यास) करुन उर्वरीत रक्कम धनादेशाने/आर टी जी एस द्वारे अदा करण्यात येईल.

३७) ज्या अधिकाऱ्यांना वाहन प्राधिकृत करण्यात आले आहे त्याच अधिकाऱ्यांची सदर वाहन दैनंदिन नोंदवहीवर स्वाक्षरी आवश्यक राहील. संबंधित अधिकाऱ्यांच्या अर्जित रजा कालावधीत ज्यांचेकडे अतिरिक्त कार्यभार दिला आहे. त्या अधिकाऱ्याने संबंधित वाहन वापरले नाही तर त्याचे देयक अदा केले जाणार नाही.

३८) वाहन पुरवठादाराने सादर केलेली सर्व देयके आस्थापना/प्रशासन विभागाकडून प्रमाणित केल्याशिवाय अदा केली जाणार नाही.

३९) भ्रष्ट, फसवणूक अथवा अव्यवहार्य सेवा असणा-या तसेच उपरोक्त आरोप सिद्ध झालेल्या व सदरची माहिती लपवून ठेवलेचे निर्दशनास आल्यास अशा निविदाधारकांची निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करणेत येईल.

४०) कंत्राटदारास ठरलेल्या दरानुसार देयकाची रक्कम अदा करणेत येईल. कंत्राटदारास यदाकदाचित देयकाची रक्कम विलंबाने अदा झाल्यास ठेकेदारास विलंबाने दिल्या गेलेल्या देयकाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

४१) उशिरा प्राप्त झालेल्या निविदा नाकारण्यात येतील व त्याबाबतचे कोणतेही कारण ग्राहय मानले जाणार नाही.

४२) GST स्वतंत्रपणे अनुज्ञेय होईल, त्यामुळे GST वगळून दर नमूद करावेत.

४३) निविदाधारकाने परिपुर्ण निविदा विहित कालावधीत संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करावयाच्या आहेत. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने निविदा सादर करावयाचा कालावधी शुध्दीपत्रकाव्दारे वाढविला असलेस अथवा बदल केलेल्या अटी व शर्ती वगळता पूर्वीच्या निविदेतील सर्व अटी शर्ती त्यास लागू राहतील.

४४) महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२५ (Maharashtra Electric Vehicle Policy-२०२५) दि.२३ मे २०२५ नुसार इलेक्ट्रीक/पर्यावरणपूरक वाहने पुरवण्यास प्राधान्य देण्यात येईल.

४५) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयासाठी पुरविण्यात येणाऱ्या गाडीमध्ये अधिकारी गाडी वापरताना "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सेवार्थ (महाराष्ट्र शासन)" असा पाटी/बोर्ड ठेवावा. कार्यालयाच्या वापराव्यतिरिक्त सदर बोर्ड गाडीत वापरू नये.

४६) वाहनाच्या वापरासाठी मनपा हद्दीमध्ये प्रतिदिन कमाल ८० किमी ची मर्यादा असून ठराविक कालावधीसाठी म्हणजेच १२ तास असाच वाहनांचा वापर केला जाईल. ज्या दिवशी ८० किमी पेक्षा जास्त व १२ तास व्यतिरिक्त अधिक कालावधीसाठी वाहन वापर झाल्यास अशा वाहनासाठी प्रति किमी दरांप्रमाणे व/किंवा प्रति तास याप्रमाणे अतिरिक्त भाडे देण्यात येईल.

४७) ज्या अधिकारी/विभागात वाहन वापरावयास निर्देशीत केले असेल तेथील अधिकारी यांचे सोयीनुसार वाहन मनपा हदीमध्ये कोणत्याही ठिकाणी वापरले जाईल. एखाद्या प्रसंगी आवश्यकतेनुसार कार्यालयाच्या अधिकारी/विभाग यांना गाडी उपलब्ध केल्यानंतर रजा किंवा सार्वजनिक सुट्टी या दिवशी गाडीचा वापर न झाल्यास त्या दिवसाचे बिल अदा केले जाणार नाही.

४८) निविदा वैधतेचा कालावधी तांत्रिक लखोटा उघडल्यापासून १२० दिवसांकरीता ग्राहय असेल. सदरचा वैधता कालावधी या कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार व परस्परांच्या संमतीने वाढविला जाईल आणि असा वाढवलेला कालावधी निविदाधारकावर बंधनकारक राहील.

**( सतीशकुमार खडके, भा.प्र.से. )**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**
**पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे**

**प्रपत्र १**

**निविदा अर्ज**

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे कार्यालयास विविध वाहने**

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे कार्यालयास विविध वाहने पुरविणेबाबत....**

**संदर्भ:- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे कार्यालयाची वाहन पुरवठा करणे बाबतची प्रसिध्द झालेली निविदा दि...........**

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आम्ही तांत्रिक लिफाफ्यात मागणी केलेप्रमाणे निविदा सादर करत असून, सर्व आवश्यक ती कागदपत्रे निविदेसोबत सादर करीत आहोत. मला/आम्हास निविदेतील सर्व शर्ती व अटी मान्य असून त्या सर्व शर्ती अटी मला/आम्हाला बंधनकारक आहेत. निविदेतील सर्व अटी व शर्ती वाचून मी/आम्ही वरील विषयांकित सेवा पुरविणे या कामाची निविदा सादर केलेली आहे. वरील विषयांकित सेवाचा दर लिफाफा क्र.२ मध्ये (ऑनलाईन पध्दतीने ) सादर केलेला आहे. लिफाफा क्र.२ हा निविदेचा एक अत्यंत महत्वाचा भाग आहे.

जर माझी/आमची निविदा मंजूर झाली तर निविदेत स्पष्ट केलेप्रमाणे स्वरुप व व्याप्तीप्रमाणे तसेच सक्षम प्राधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे सेवा देण्यास मी/आम्ही बांधील राहू व सदर बाबतीत माझी /आमची तक्रार असणार नाही.

जर माझी/आमची निविदा मंजूर करण्यात आली तर आम्हास निविदेतील नियमाप्रमाणे देय असलेली अनामत रक्कम ३० दिवसांत जमा करणे व करार करणे आम्हास बंधनकारक आहे व सदर बाबतीत आमची तक्रार असणार नाही.

आम्हांस निविदेच्या ३६ महिने कालावधीमध्ये नमूद केलेल्या दराप्रमाणे कामाचे स्वरुप व व्याप्ती नुसार सेवा पुरविणे मला/आम्हांस बंधनकारक राहील. सदरच्या कालावधीकरीता मी/आम्ही सर्व नियम व अटीनुसार सेवा पुरविणेस बांधील राहू.

आमची निविदेसंदर्भात कोणतीही शर्त नसून प्राधिकरणाच्या शर्ती-अटीप्रमाणे विषयांकित कामकाज पार पाडण्याची आमची तयारी आहे.

स्थळ : निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का

दिनांक :-

(निविदाकार संस्था/कंपनी असल्यास संचालक मंडळाचा प्राधिकाराबाबतचा ठराव सादर करावा.)

**प्रपत्र २**

मागील पाच वर्षात अन्य शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये किंवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पुरविलेल्या वाहन सेवेबाबतचा तपशील

| अ.क्र. | सेवा पुरवण्यात येत असलेल्या संस्थेचे नांव व पत्ता | आदेश क्र. व दिनांक | कालावधी | गाड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

सोबत :- वरील कामाकाजाबाबतच्या कार्यादेशाच्या छायांकित प्रती.

निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का
दिनांक :-

**प्रपत्र ३**

(मागील ३ वर्षातील आर्थिक उलाढालीबाबतचे तसेच नक्त मुल्याबाबतचे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र)

ANNUAL TURNOVER STATEMENT FOR LAST THREE YEARS

The Annual Turnover of M/s                                        For the last three years are given below and certified that the statement is true and correct.

| Sr.No. | Year | Turnover (Rs.in Lakhs) | Networth (Rs.in Lakhs) |
|---|---|---|---|
| १ | २०२३-२०२४ | | |
| २ | २०२२-२०२३ | | |
| ३ | २०२१-२०२२ | | |

Date :-

Seal

Signature of Bidder

Signature of Auditor/

Name (in capital letters) of the Chartered Accountant of the bidder

**प्रपत्र -४**

## प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही झोपुप्रा, पुणे कार्यालयाकरीता निविदेत नमूद केलेप्रमाणे विविध वाहनांचा पुरवठा करण्यासंबंधीच्या निविदेच्या अटी व शर्तींचे काळजीपुर्वक वाचन केले असून त्या सर्व समजून घेतल्या आहेत. त्यानुसार मला/आम्हाला /आमच्या संस्थेस वाहने पुरवठा करणेसंबंधी तसेच इतर कोणत्याही कारणास्तव कोणत्याही प्रकारची आर्थिक/दंडात्मक कारवाई कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयामार्फत झाली नाही.

माझ्यावर/आमच्यावर/आमच्या संस्थेवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा (दखलपात्र/अदखलपात्र) आजअखेर काणत्याही पोलिस स्टेशनमध्ये दाखल झालेला नाही. तसेच कोणत्याही न्यायालयाकडून आजअखेर कोणत्याही प्रकारची शिक्षा ठोठावली नाही, तसेच कोणत्याही शासकीय/निमशासकीय , खाजगी संस्थेने आज अखेर आम्हास/आमच्या संस्थेस काळ्या यादीत घातले नाही.

मी /आम्ही/आमच्या संस्थेने सादर केलेली कागदपत्रे ही सत्य असून निविदेतील सर्व शर्ती व अटी मला/आम्हाला मान्य आहेत व त्यानुसारच झोपुप्रा., पुणे कार्यालयास विविध वाहनांचा पुरवठा निविदेतील शर्ती अटीनुसार करण्यास बांधील राहू.

वरील मजकुर माझ्या/आमच्या माहितीप्रमाणे सत्य व खरा आहे. मी/आम्ही/आमच्या संस्थेने आवश्यकतेप्रमाणे (निविदेतील शर्ती व अटीप्रमाणे) सेवा न पुरविल्यास व उपरोक्तची माहिती खोटी निघाल्यास निविदेत नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार मी/आम्ही/आमची संस्था दंडणीय कार्यवाहीस तसेच मी/आम्ही/आमची संस्था भां.द.वि.वि.कलम १९९ व २०० प्रमाणे शिक्षेस पात्र राहील/राहू. सदर मजकुर आज दि.  /  /२०२५ रोजी मुक्कामी प्रमाणित केलेला आहे.

स्थळ :- ----------------

दिनांक :- --------------

निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का.

प्रपत्र – ५

(वित्तीय निविदा)

निविदाधारकाने वित्तीय लिफाफ्यामधील माहिती खालील पध्दतीने सादर करावी.

अ. कार्यालयीन वापरासाठीचे दर :-

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | संख्या | प्रति दिन १२ तास/८० किमी करीता रक्कम | अतिरिक्त प्रति किमी साठी रक्कम | अतिरिक्त प्रति तास साठी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | इनोव्हा (एसी) | १ | | | |
| २ | सेडान संवर्ग (एसी) | १४ | | | |
| ३ | एर्टिगा/बोलेरो | २ | | | |

ब. कार्यालयीन कामाकाजाकरीता प्राधिकरण क्षेत्राबाहेरील वापराच्या वेळी प्रस्तावित केलेले वाहन दर :-

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | दर प्रति किमी | वाहन मुक्कामी राहिल्यास मुक्कामासाठी एक दिवसाचा अतिरिक्त दर |
|---|---|---|---|
| १ | इनोव्हा (एसी) | | |
| २ | सेडान संवर्ग (एसी) | | |
| ३ | एर्टिगा/बोलेरो | | |

टिप : १) उपरोक्त दरामध्ये जीएसटी दर विचारात घेऊ नयेत. जीएसटी रक्कम प्रचलित दराप्रमाणे स्वतंत्र अदा केली जाईल.

२) वाहन वापरासंदर्भातील सर्व प्रकारचा खर्च (वाहनचालक, इंधन, टोल, कर, पार्किंग चार्जेस, विमा, पीयुसी, वाहन देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक खर्च) निविदाकाराने/कंत्राटदाराने करणे आवश्यक आहे.

**३) ज्या संस्थेने तक्ता क्र. अ व तक्ता क्र. ब मध्ये सादर केलेले दर मिळून ज्यांचे दर सर्वात कमी येतील त्यांना L१ गृहीत धरण्यात येईल.**

दिनांक :- --------------

निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का.

## प्रपत्र-६

### निविदाधारकामार्फत उपलब्ध केली जाणा-या १७ वाहनांचा तपशील

| अ.क्र. | वाहन प्रकार | आर टी ओ कडील वाहन नोंदणी क्रमांक | आर.सी. बुक क्रमांक | वाहन खरेदी दिनांक | वाहन मालकाचे नाव | वाहन स्व:मालकीचे नसल्यास निविदाकाराने वाहन मालकाशी केलेल्या भाडे कराराची प्रत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |
| ७ | | | | | | |
| ८ | | | | | | |
| ९ | | | | | | |
| १० | | | | | | |
| ११ | | | | | | |
| १२ | | | | | | |
| १३ | | | | | | |
| १४ | | | | | | |
| १५ | | | | | | |
| १६ | | | | | | |
| १७ | | | | | | |

उपरोक्त प्रकरणी संबंधित वाहनांचे आर.सी. बुक, पी.यु.सी., टुरिस्ट परवाना, कर भरणा व विमा आदि सर्व तपशिलाच्या छायांकित प्रति सादर केल्या आहेत.

दिनांक :- --------------

निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का.